Chakan Shikshan Mandal's

# Arts & Commerce College, Chakan

Agarwadi Road, A/P. Chakan, Tal. Khed, Dist. Pune - 410 501



## 3rd Cycle

## Assesment and Accreditation

## Criterion-VI

## Teaching – Learning & Evaluation

CHAKAN SHIKSHAN MANDAL'S
**Arts & Commerce College, Chakan**
Agarwadi Road, A/P. Chakan, Tal. Khed, Dist. Pune - 410 501
Affiliated to Savitribai Phule Pune University, (I. D. No. PU/PN/075-1989)
Website : www.csmaccc.com | Phone : 8087767451 | Email : csmaccc@rediffmail.com

Ref. No. CSMACCC / 214 /2022-23 Date : 20 / 06 /2023

## DECLARATION

**This is to declare that the information, reports, true copies of the supporting documents, numerical data etc. submitted/presented in this file is verified by Internal Quality Assurance Cell ( IQAC) and is correct as per the records. This declaration is for purpose of NAAC accreditation of HEI for 3rd cycle period 2017-18 to 2021-22.**

**Date: 20 June 2023**

**Place: Chakan**

**Prof. Vikas Deshmukh**
Coordinator
I.Q.A.C.
Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune.

C.S.M.'s Arts & Com. College * CHAKAN 410501 * Tal-Khed, Dist-Pune.

**Dr. Rajesh Latane**
Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune.

**Principal,**
**Dr. Rajesh Latane**
M. A. (English), SET, Ph.D.
**Mob. :** 9423327281, 7972698175
**Email :** rslatane@gmail.com


**6.3.3.c Annual reports highlighting the programmes undertaken by the teachers**

# Table of Content



| Sr. No | **Student Name** | |
|---|---|---|
| 1. | Annual Reports 2017-18 | 4-17 |
| 2. | Annual Reports 2018-19 | 11-18 |

# Annual Reports 2017-18



* प्रेरणास्थान *



मा. श्री. शरदजी जोशी

माजी खासदार राज्यसभा,
संस्थापक, शेतकरी संघटना
संस्थापक, चाकण शिक्षण मंडळ

## चाकण शिक्षण मंडळ



मा. श्री. शांतीलालजी मुथ्था
कार्यकारी विश्वस्त



मा. श्री. मोतीलालजी सांकला
प्रमुख विश्वस्त



मा. डॉ. अविनाशजी आरगडे
विश्वस्त सचिव



चाकण शिक्षण मंडळाचे,

# कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण

नॅक मानांकित

## चक्रभूमी

२०१७-१८

## अंधश्रद्धा

विशेषांक

* संपादक मंडळ *

प्राचार्य, डॉ. राजेश लाटणे
प्रा. डॉ. दिलीप कसबे
प्रा. विकास देशमुख
प्रा. अफरोज इनामदार
प्रा. मिलिंद भुजबळ
श्री. भास्कर सरकटे
कु. माधुरी चव्हाण

1

चाकण शिक्षण मंडळाचे

## कला वं वाणिज्य महाविद्यालय, चाकण

# चक्रभूमी

२०१७-२०१८

# अंधश्रद्धा विशेषांक

चक्रभूमी या वार्षिक नियतकालिकाच्या स्वामित्वाबद्दल व अन्य तपशीलाबाबत निवेदन दि प्रेस अँन्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट नियम ८ व ४ प्रमाणे आवश्यक माहिती

प्रकाशन स्थळ : चाकण शिक्षण मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१

प्रकाशन काळ : २०१७-१८

मुद्रकाचे नाव : श्री. नवरंग ट्रेडर्स

पत्ता : दुकान नं. २३/२४/५६, गुरुदत्त सहवास सोसायटी, शनिवार पेठ, पुणे - ४११०३०

प्रकाशकाचे नाव : प्राचार्य डॉ. राजेश लाटणे
चाकण शिक्षण मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१

नियतकालिकाची मालकी : चाकण शिक्षण मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१

संपादकाचे नाव : प्रा. डॉ. दिलीप कसबे
चाकण शिक्षण मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१

* या अंकातील सर्वच मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

* हा अंक फक्त खाजगी वितरणासाठी आहे.





## आमचे धोरण

ग्रामीण भागातून आलेल्या आमच्या विद्यार्थ्यांना सर्वांगीने सामर्थ्यशाली बनविणे आणि त्यांची उन्नती करणे, हे आमचे धोरण आहे. याबरोबरच त्यांना स्वावलंबी करणे, त्यांचे ज्ञान आणि दृष्टी व्यापक करणे आणि जागतिकीकरणाच्या बदलत्या वातावरणात त्यांना उभे राहण्याची क्षमता प्राप्त करून देणे आणि प्रामुख्याने नैतिक, सामाजिक, बौद्धिक आणि सांस्कृतिक पातळीवर एक चांगली व्यक्ती म्हणून ते ओळखले जातील यासाठी सतत कार्यरत राहणे, हा धोरणातील महत्त्वाचा घटक आहे.

## ध्येय/उद्दिष्टे

१) विद्यार्थ्यांमध्ये नीतिमूल्ये आणि वचनबद्धता यांचे महत्त्व रुजविणे.
२) शहरीकरणामुळे निर्माण झालेल्या सर्व नागरी सुविधा खात्रीशीररित्या पुरविणे.
३) छोट्या पण उपयुक्त अभ्यासक्रमांची ओळख करून देणे.
४) उपयुक्त अभ्यासक्रम उपलब्ध करून देणे.
५) वाणिज्य प्रयोगशाळा, भाषिक प्रयोगशाळा, ग्रंथालय व जिमखाना या विशेष क्षेत्रातील सुविधांनी महाविद्यालय सुसज्ज करणे.
६) वैचारिक आणि व्यावहारिक जीवनात विद्यार्थ्यांना स्वयंपूर्ण करणे.

## वैचारिक दृष्टी

उत्तम शैक्षणिक वातावरणात विद्यार्थ्यांना स्वत:च्या ताकदीची आणि क्षमतेची ओळख होऊन, उत्तम विचार आणि उन्नत आकांक्षा साकार करण्याची दृष्टी मिळून त्यांचं एक परिपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवणे, हेच आमचे स्वप्न!

## बोधवाक्य

"आश्वासक आत्मविकास"

## * महाविद्यालय विकास समिती *

मा. श्री. मोतीलालजी सांकला – अध्यक्ष, म. वि. स.
मा. ॲड. राजेश कांडगे – सदस्य, म. वि. स.
श्री. प्रकाश मुटके – सदस्य, म. वि. स.
प्रा. डॉ. शिवाजी एंडाईत – सदस्य, म. वि. स.
प्रा. डॉ. अपर्णा महाजन – सदस्या, म. वि. स.
सौ. योगिता गवळी – सदस्या, म. वि. स.
मा. डॉ. अविनाश अरगडे – सचिव, चा. शि. स
मा. श्री. रामदास धनवटे – सदस्य, म. वि. स.
प्रा. डॉ. राजेंद्र रसाळ – सदस्य, म. वि. स.
प्रा. डॉ. दत्तात्रय तांबे – सदस्य, म. वि. स.
प्रा. विकास देशमुख – सदस्य, म. वि. स.
प्राचार्य डॉ. राजेश लाटणे – सचिव, म. वि. स

## * महाविद्यालयीन अध्यापक *

### * कला शाखा *

| | |
|---|---|
| अर्थशास्त्र विभाग : | डॉ. राजेंद्र रसाळ, विभाग प्रमुख |
| | प्रा. अंकुश सूर्यवंशी |
| मराठी विभाग : | प्रा. डॉ. दिलीप कसबे, विभाग प्रमुख |
| | प्रा. डॉ. शिवाजी एंडाईत |
| इंग्रजी विभाग : | डॉ. राजेश लाटणे, प्राचार्य |
| | प्रा.डॉ. अपर्णा महाजन, विभाग प्रमुख |
| | प्रा. ज्ञानेश्वरी शिंदे |
| राज्यशास्त्र विभाग : | प्रा. डॉ. सोपान घोळवे, विभाग प्रमुख |
| इतिहास विभाग : | प्रा. विकास देशमुख, विभाग प्रमुख |

### * वाणिज्य शाखा *

प्रा. डॉ. दत्तात्रय तांबे, विभाग प्रमुख
प्रा. हेमकांत गावडे
प्रा. अफरोज इनामदार
प्रा. हनुमंत मराठे

### * संगणक शाखा *

प्रा. अफरोज इनामदार विभाग प्रमुख
प्रा. शिल्पा फुलवरे
प्रा. मंजिरी परदेशी
प्रा. शितल पवळे

### * ग्रंथालय विभाग *

प्रा. मिलिंद भुजबळ, ग्रंथपाल

### * क्रीडा विभाग *

प्रा. शैलेंद्र कांबळे, शारीरिक शिक्षण संचालक

## * कार्यालयीन सहकारी वर्ग *

सौ. योगिता गवळी – मुख्य लिपिक
श्री. अनिकेत कदम – कनिष्ठ लिपिक
श्री. नंदकुमार पाटकर – ग्रंथालय परिचर
श्री. राजाराम डोरे – सेवक
श्री. शंकर नाईकनवरे – सेवक
श्री. शिवाजी भोसले – सेवक
श्री. अरूण जाधव – सेवक





## * विद्यार्थी परिषद *

महाविद्यालयामधे विद्यापीठ कायद्यानुसार विद्यार्थी परिषदेची स्थापना दिनांक ४ जानेवारी २०१८ रोजी करण्यात आली. विद्यार्थी परिषद २०१७-१८ पुढील प्रमाणे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) मा. प्राचार्य डॉ. राजेश लाटणे | - | अध्यक्ष | | |
| २) प्रा. हेमकांत गावडे | - | सदस्य | | |
| ३) प्रा. डॉ. दत्तात्रय तांबे | - | सदस्य | | |
| ४) प्रा. शैलेंद्र कांबळे | - | सचिव | | |
| ५) श्री.विश्वनाथ लिंभोरे | - | वर्ग प्रतिनिधी | प्रथम वर्ष कला | - सदस्य |
| ६) श्री. गोविंदा राठोड | - | वर्ग प्रतिनिधी | द्वितीय वर्ष कला | - सदस्य |
| ७) श्री. नितीन दौंडकर | - | वर्ग प्रतिनिधी | तृतीय वर्ष कला | - सदस्य |
| ८) कु. माधुरी पाठक | - | वर्ग प्रतिनिधी | प्रथम वर्ष वाणिज्य | - सदस्य |
| ९) श्री. सचिन गुंगाळ | - | वर्ग प्रतिनिधी | द्वितीय वर्ष वाणिज्य | - सदस्य |
| १०) श्री. नंदकुमार आरेकर | - | वर्ग प्रतिनिधी | तृतीय वर्ष वाणिज्य | - सदस्य |
| ११) कु. निकिता घाटे | - | वर्ग प्रतिनिधी | प्रथम वर्ष संगणक | - सदस्य |
| १२) कु. हर्षदा कुटे | - | वर्ग प्रतिनिधी | द्वितीय वर्ष संगणक | - सदस्य |
| १३) कु. वनिता धनवट | - | वर्ग प्रतिनिधी | तृतीय वर्ष संगणक | - सदस्य |
| १४) कु. भाग्यश्री शिंदे | - | क्रीडा प्रतिनिधी | | - सदस्य |
| १५) श्री. आकाश भोकसे | - | रा. से. यो. प्रतिनिधी | | - सदस्य |
| १६) श्री. राम नलावडे | - | सांस्कृतिक प्रतिनिधी | | - सदस्य |
| १७) कु. माधुरी चव्हाण | - | प्राचार्य प्रतिनिधी | | - सदस्य |
| १८) कु. आरती नवले | - | प्राचार्य प्रतिनिधी | | - सदस्य |

### * महाविद्यालयात मिळणाऱ्या शिष्यवृत्ती व शुल्क सवलती *

**राज्यशासनाच्या आर्थिक सवलती -**

निरनिराळ्या शासकीय योजनेद्वारे पात्र विद्यार्थ्यांना खालील सवलती उपलब्ध आहेत.

१. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना फी सवलत (E.B.C.)
२. शासकीय खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.
३. प्राथमिक शिक्षकांच्या मुला- मुलींना पात्रतेनुसार मिळणारी फी/सवलत.
४. अनुसूचित जाती- जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती फी/ सवलत.
५. अपंग मुलांना शिष्यवृत्ती
६. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मिळणारी फी/ सवलत.
७. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी (E.B.C.) फी/ सवलती
८. स्वातंत्र्य सैनिकांच्या संरक्षण खात्यातील मुला-मुलींना मिळणारी फी/ सवलत
९. शासकीय खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती (Government merit scholarship)

### * शै. वर्ष २०१७-१८ मधील गुणवंत विद्यार्थी *

| * कला शाखा * | | * वाणिज्य शाखा * | | * बी. सी. ए. * | |
|---|---|---|---|---|---|
| **प्रथम वर्ष** | | **प्रथम वर्ष** | | **प्रथम वर्ष** | |
| कु. शिल्पा तेजस फुलवरे | ७७.०% | कु. मिसबा कासम काझी | ७९.२८% | कु. निकिता दिनेश जगदाळे | ८१.६७% |
| कु. काजल मारुती पोटवडे | ७१.७% | कु. आरती मनोहर जाधव | ७२.४२% | कु. उज्वला भारत पडवळ | ७५.८३% |
| कु. प्रियांका किसन शिंगन | ७०.७% | कु. संजना अशोक नलावडे | ७२.४२% | कु. स्नेहल विकास कड | ७३.७५% |
| | | कु. मृणाली विनायक गांडेकर | ७१.८५% | | |
| **द्वितीय वर्ष** | | **द्वितीय वर्ष** | | **द्वितीय वर्ष** | |
| कु. धनश्री काळूराम शिंदे | ७५.७% | कु. प्रतिक्षा माणिक फडके | ८०.३३% | कु. रोशनी सुरेश कोळेकर | ७०.७५% |
| श्री. गोविंदा अर्जुन राठोड | ६९.२% | कु. सुमय्या नासिर इनामदार | ७६.३३% | श्री. हर्षद आनंदा कुटे | ६७.११% |
| कु. पल्लवी अरुण काळडोके | ६७.७% | श्री. सचिन राजाराम गुंजाळ | ७५.८३% | | |
| **तृतीय वर्ष** | | **तृतीय वर्ष** | | **तृतीय वर्ष** | |
| कु. पूजा दिनेश पवळे | ६७.६% | श्री. नंदकुमार चंद्रराव आरेकर | ७६.९१% | कु. ऐश्वर्या महादेव कारगुडे | ७६.६७% |
| कु. मनिषा आत्माराम डावरे | ६६.८% | श्री. अभिजीत पोपट पडवळ | ७४.४१% | कु. वनिता विश्वनाथ घनवट | ७६.२०% |
| श्री. किरण लहू येवले | ६४.१% | कु. भारती रामदास पोटवडे | ७४.६६% | कु. सुजाता रामदास येनभर | ७१.०८% |





### * महाविद्यालयाचे इतर संस्थांबरोबर असलेले सामंजस्य करार (MOU) *

महाविद्यालयाने विद्यार्थी एक केंद्रबिंदू मानून, महाविद्यालयातील विविध घटकांची उन्नती व्हावी, यासाठी खालील संस्थांशी समजूतीचा करार केला आहे.

**१. शैक्षणिक -**
बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेज, पुणे
ELTIS - इंग्लिश लँग्वेज टिचिंग इन्स्टिट्यूट ऑफ सिम्बॉयसिस
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, खेड
पद्मणी जैन आर्टस् अँन्ड कॉमर्स कॉलेज, पाबळ

**२. सामाजिक -**
निर्मल बाल विकास संस्था, ठाकूर पिंपरी
संपर्क बाल ग्राम अनाथालय, शेल पिंपळगाव

**३. सांस्कृतिक -**
अभिजात ललित कला मंच, चाकण
फिरंगोजी नरसाळा प्रतिष्ठान, चाकण

**४. पतसंस्था :** फिरंगोजी नरसाळा सहकारी पतसंस्था, चाकण

**५. स्पर्धात्मक परीक्षा**
विकास करिअर अॅकॅडमी, चाकण
स्टडी सर्कल, मुंबई

**६. आरोग्य**
डॉ. अरगडे हॉस्पिटल, चाकण
डॉ. काळे हॉस्पिटल, चाकण
संजीवनी हॉस्पिटल, चाकण

**७. उद्योग व्यवसाय**
प्राईम सिंटेक प्रा. लि. - चाकण एमआयडीसी, निघोजे
चाकण इंडस्ट्रिअल असोसिएशन, चाकण
मराठे इंडस्ट्रीज - चाकण एमआयडीसी, निघोजे

## आश्वासक आत्मविकास
## Assured Self Enhancement

Assured Self Enhancement

Most of our students hail from the rural area. They have very strong ties with the soil. The farming families, where they are born and brought up, play a major role in moldings their values, attitudes, and various aspects of their personality. So we, as educationists, have to be very careful and vigilant. We are proud to say that as an institution, we deeply respect their roots and try to bring out the best in them. We want them to keep their self-esteem intact and use it as a spring board to take the leap in the world outside.

We have given a deep thought while creating our motto and the symbol. The blades of grass remind us the close relation of our students with the earth; the soil and the farming. One blade of grass delicately curves itself into the letter 'ज्ञ' which stands for ज्ञान, knowledge, learning. We want to be the wind beneath the wings of our students. Our institution moulds them in such a way that they never feel embarrassed or humiliated to go back to the occupation of their forefathers, nor will they find themselves misfit in other walks of life. They will be educated, cultured and confident adults to face the world. Hence **Assured Self Enhancement.**

Written by Prof. Aparna Mahajan





## प्राचार्यांचे मनोगत

प्राचार्य, डॉ. राजेश लाटणे



महाराष्ट्रास अतिशय थोर अशा महापुरुषांची, स्त्रियांची उज्वल परंपरा आहे. संत ज्ञानेश्वर, संत चोखामेळा, संत नामदेव, संत गोरा कुंभार, संत सावता माळी, संत नरहरी सोनार, संत जनाबाई यांच्यापासून ते संत तुकाराम, संत एकनाथ, संत मुक्ताई असे अनेक संत महात्मे या भूमीने समस्त मानव जातीसाठी दिले. या सर्व संतांच्या शिकवणीचे सार म्हणजे अंधाराकडून प्रकाशाकडे दिशादर्शक व पारदर्शक मानवी जीवन. अर्थात या जीवनरूपी प्रवासामध्ये कोणत्याही संताने अंधश्रध्देचा दाखला दिलेला ज्ञात नाही. अथवा एखादा दृष्टांत किंवा चमत्कार आपल्या अभंगांमध्ये रचला आहे. म्हणूनच सर्व जाती धर्मांच्या संतांची शिकवण ही कालातीत आहे, आधुनिक आहे आणि अमर्याद कालखंडास लागू आहे.

महाराष्ट्राने चिकित्सात्मक, शास्त्रीय, वैज्ञानिक दृष्टीकोनातून जीवनाकडे पाहणारे विचारवंत दिले. गोपाळ गणेश आगरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज, सावित्रीबाई फुले, र.धों. कर्वे, संत गाडगे महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील अशा अनेक प्रभूतींनी आपापल्यापरीने अंधश्रध्दा निर्मूलनाचे महान कार्य केले. ब्रिटीश सत्तेच्या अस्तानंतर, स्वतंत्र भारतामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन अंगिकारुन नवीन शिक्षण पद्धती निर्माण करता आली असती. परंतु तत्कालीन राज्यकर्त्यांनी शिक्षण व समाज प्रबोधन यांस धोरणात्मक, संस्थात्मक आणि व्यवस्थात्मक स्वरुप दिले नाही. त्याचा दुष्परिणाम म्हणजे आपला समाज साक्षर झाला, शिक्षित झाला व तंत्रज्ञानस्नेही झाला, परंतु संपूर्णपणे शहाणा झाला नाही. आजही आपल्याकडे संगणक संच, वाहन अथवा कोणतीही वस्तू खरेदी केल्यानंतर वापरण्याआधी त्यांची पूजा केली जाते.

जन्मतःच अनेक वाईट परंपरा आपल्याला चिकटविल्या जातात. जात आणि धर्म आपणांस न मागताच मिळतात. त्याचबरोबर त्या जातीधर्मात चालत असलेल्या अनिष्ट परंपराही आपल्यावर लादल्या जातात. त्या अनिष्ट परंपरा व प्रथांना विरोध केल्यास जात,धर्म बहिष्कृत करण्याची शिक्षा दिली जाते. त्यामुळे पुढच्या पिढींच्या विवाहादी समस्या पुढे येतात. म्हणून कोणताही शिकलेला व्यक्ती विवेकवादी भूमिका घेण्याचे टाळतो व दांभिकतेमध्येच राहणे पसंत करतो.

अशा समाजामध्ये जिथे जातींचे वर्चस्व आहे, धर्मांचा पगडा आहे. अनिष्ट प्रथा परंपरा आहेत. त्या समाजामध्ये बुवा व बाबा आपल्या विकृत मनोवृत्तीने वर्चस्व गाजवतात. यामध्ये स्त्रियांचे शोषण होते, गरीबांचे आर्थिक शोषण होते, लहान मुलांचे बळी जातात. परंतु हे बुवा, बाबा, माता हे इतके शक्तीशाली असतात की, राजकीय व्यवस्थेमधील, प्रशासनातील आणि उद्योजकांमधील खूप प्रभावशाली व्यक्ती यांचे भक्तगण असतात.

या अंधश्रध्दाळू, दांभिक व्यवस्थेला नम्रपणे आव्हान देण्याचे कार्य डॉ. नरेंद्र दाभोळकर करायचे. त्यांना ज्ञात होतं की व्यवस्था बदलणे अवघड आहे, परंतु अशक्य नाही. म्हणून त्यांनी हळूवारपणे, लोकांच्या भावनांना इजा न करता, अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य हाती घेतले होते. परंतु वर उल्लेख केलेल्या काही सनातनी विकृत प्रवृत्तींनी त्यांचा बळी घेतला. आपणा सर्वांना सर्व संतांनी दाखविलेला, महामानवांनी चिकित्सा केलेला, डॉ. दाभोळकरांनी दाखविलेल्या मार्गाचा अंगिकार करायचा आहे व अंधश्रध्देला मूठमाती द्यायची आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | भोंदू बाबा | तुषार राक्षे | २८. |
| ९. | देवावरील खोटी अंधश्रद्धा | सोनल कुडेकर | ३०. |
| १०. | भ्रम आणि निरास | निकिता जाधव | ३२. |
| ११. | ज्ञानज्योत | अश्विनी राऊत | ३४. |
| १२. | अंधश्रद्धा आणि वास्तव | तुषार राक्षे | ४६. |

| अ.क्र. | शैक्षणिक अहवाल | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | ग्रंथालय विभाग | प्रा. मिलिंद भुजबळ | ४७. |
| २. | जिमखाना विभाग | प्रा. शैलेंद्र कांबळे | ४८. |
| ३. | वाणिज्य विभाग | प्रा. डॉ. दत्तात्रय तांबे | ४९. |
| ४. | अर्थशास्त्र विभाग | प्रा. डॉ. राजेंद्र रसाळ | ५०. |
| ५. | मराठी विभाग | प्रा. डॉ. दिलीप कसबे | ५१. |
| ६. | इंग्रजी विभाग | प्रा. डॉ. अपर्णा महाजन | ५१. |
| ७. | राज्यशास्त्र विभाग | प्रा. डॉ. सोपान घोळवे | ५२. |
| ८. | इतिहास विभाग | प्रा. विकास देशमुख | ५३. |

| अ.क्र. | अभ्यासपूरक उपक्रम | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | विविध स्पर्धा विभाग | प्रा. डॉ. दिलीप कसबे | ५४. |
| २. | परीक्षा विभाग | प्रा. डॉ. शिवाजी एंडाईत | ५५. |
| ३. | स्पर्धा परीक्षा विभाग व बहि:शाल शिक्षण मंडळ | प्रा. अंकुश सूर्यवंशी | ५६. |
| ४. | अल्पकालीन अभ्यासक्रम | प्रा. डॉ. अपर्णा महाजन | ५८. |

| अ.क्र. | अभ्यासेतर उपक्रम | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | राष्ट्रीय सेवा योजना | प्रा. डॉ. दत्तात्रय तांबे | ५८. |
| २. | विशेष श्रम संस्कार शिबिर | प्रा. डॉ. दत्तात्रय तांबे | ६१. |
| ३. | सांस्कृतिक विभाग | प्रा. मिलिंद भुजबळ | ६२. |
| ४. | प्लेसमेंट विभाग | प्रा. अफरोज इनामदार | ६३. |
| ५. | विद्यार्थिनी उद्योजकता | प्रा. डॉ. सोपान घोळवे | ६४. |
| ६. | विद्यार्थी विकास मंडळ | प्रा. हेमकांत गावडे | ६४. |
| ७. | स्थानिक तक्रार निवारण समिती | प्रा. शैलेंद्र काबळे | ६५. |
| ८. | प्राध्यापक प्रबोधिनी | प्रा. डॉ.दिलीप कसबे | ६६. |
| ९. | लैंगिकछळ तक्रार निवारण समिती व विद्यार्थी पालकसभा | प्रा. डॉ. अपर्णा महाजन | ६६. |
| १०. | कॅम्पस फिल्म सोसायटी | प्रा. डॉ. अपर्णा महाजन | ६७. |
| ११. | विद्यार्थी परिषद व नेचर व ट्रेक क्लब | प्रा. शैलेंद्र काबळे | ६७. |
| १२. | मा. शरद जोशी वैचारिक व्याखानमाला | प्रा. विकास देशमुख | ६८. |






# जादूटोणा कायदा : अडचणी व त्रुटी


ऋषीकेश चव्हाण
तृतीय वर्ष कला

'महाराष्ट्र नरबळी व इतर अमानवी, अघोरी प्रथा, जादूटोणा निवारण व उच्चाटण कायदा २०१३,' जो सामान्यतः अंधश्रद्धा निर्मूलन कायदा म्हणून ओळखला जातो, तो महाराष्ट्र राज्यात २६ ऑगस्ट २०१३ पासून अमलात आला. सध्या तरी देशभरात महाराष्ट्र हे एकमेव असे राज्य आहे की, जिथे असा कायदा अस्तित्वात आहे. मात्र त्याच्या अंमलबजावणीची नेमकी स्थिती काय आहे, या गोष्टीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला असता चित्र निराशजनक दिसते. नेमकी व खात्रीलायक माहिती मिळवण्यासाठी माहिती अधिकाराद्वारे नऊ पोलीस आयुक्तालये व ३४ जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालये यांच्याकडून, त्यांच्या कार्यक्षेत्रातील पोलीस ठाण्यांशी संबंधीत माहिती मागविण्यात आली.

अंमलबजावणीच्या चर्चेआधी, ती कशाची व्हावयास हवी होती, याची माहिती घेणे क्रमप्राप्त आहे. हा मूळ कायदा बारकाईने अभ्यासल्यास असे लक्षात येते की, हा कायदा खरेच अत्यंत विचारपूर्वक बनविण्यात आला आहे. नरेंद्रजी दाभोळकर यांनी नेहमीच शक्यतो संघर्षापेक्षा समन्वयाची व तडजोडीची भूमिका स्वीकारली आहे. जी या कायद्याच्या विविध तरतुदीत स्पष्टपणे प्रतिबिंबीत झालेली दिसून येते. श्रद्धा, अंधश्रद्धा, ईश्वरविषयक श्रद्धा, धार्मिक श्रद्धा या संबंधीच्या न संपणाऱ्या वादात हा कायदा अडकू नये, यासाठी या कायद्याला जोडण्यात आलेल्या सूची (शेड्यूल) २ (१) ब मध्ये केवळ १२ मुद्दे देण्यात आले आहेत. ज्या या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी 'अंधश्रद्धा' व निषिद्ध, गुन्हे मानण्यात येतील. अशा तऱ्हेने अंधश्रद्धा नेमके कशाला, कुठल्या विशिष्ट कृतींना म्हणावे, याचा स्पष्ट निर्णय-निदान या कायद्यापूरता तरी लावण्यात आला आहे. संपूर्ण कायद्यात होता होई तो कुठेही धर्म, धार्मिक श्रद्धा, ईश्वर, साधू-संत यांचा उल्लेख नाही. उलट, कलम १२ (१) मध्ये, ज्या गोष्टींना या कायद्यातल्या तरतुदी लागू होत नाहीत, ते 'अपवाद' दर्शवताना त्यात अनेक धार्मिक पूजापाठ, हरिपाठ, कीर्तन, प्रवचन, प्रदक्षिणा, परिक्रमा, व्रतवैकल्ये, वारी, नवस, मन्नत तसेच पूर्वी होऊन गेलेल्या संताचे चमत्कार वर्णन करणे, मंदीर, दर्गा, गुरुद्वारा, चर्च व इतर धार्मिक स्थळी केले जाणारे धार्मिक विधी, सण, उत्सव असे कित्येक प्रकार नमूद करून या कायद्याला धार्मिक अभिनिवेशातून विरोध होऊ नये, याची काळजी घेतली गेली आहे. कायद्यातील तरतुदींना अपवाद म्हणून असलेल्या या गोष्टी ठरवताना, मुख्यतः ज्यामध्ये व्यक्तिला शारीरिक इजा किंवा आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाही. अशाच गोष्टींचा अंतर्भाव व्हावा, ही कल्पना होती. मात्र या आपवादांमध्ये कडकलक्ष्मी (अंगावर चाबकाचे फटके मारून घेणे), मोहरमच्या मिरवणुका (ज्यात हुसेनच्या हौतात्म्याची आठवण म्हणून शरीरावर फटके मारून घेतले जातात) व जैनांचा 'केशलोचन विधी' (ज्यात चिमट्याने शरीरावरील केस उपटले जातात) तसेच ज्योतिष, वास्तू विशयक सल्ले देणे, भुमिगत पाण्याचा शोध घेण्यासंबंधी सल्ले इ. ज्यात आर्थिक नुकसान होऊ शकते, हे देखील समाविष्ट केल्याने कायदा हा बराच सौम्य करण्यात आल्याची टीका होऊ शकते. शिवाय कलम १२(१) (२) नुसार 'प्राचीन ग्रंथ, साहित्य, कला यांचा अभ्यास व प्रचार-प्रसार यांचाही अपवादच केल्याने बऱ्याच घातक, निषिद्ध गोष्टी स्वीकाराव्या लागतील.

उदा. जारणमारण, वशीकरण, अघोर तंत्र, करणी असे अनेक प्रकार (जे या कायद्यानुसार निषिद्ध आहेत). अथर्ववेदात किंवा इतर प्राचीन ग्रंथात आढळतील. उद्या कोणी या विद्यांचे रीतसर शिक्षण देणाऱ्या पाठशाळा काढल्या, तर त्या जणू 'वेद पाठशाळा' असल्याप्रमाणे स्वीकारायच्या का? अलीकडेच डॉ.बालाजी तांबे यांच्या 'आयुर्वेदीय गर्भसंस्कार' या पुस्तकामधील पुत्रप्राप्तीसाठी करावयाच्या 'पुसवन' विधीसंबंधी दिलेल्या माहितीवरून

# Annual Reports 2018-19



## ✲ प्रेरणास्थान ✲



**मा. श्री. शरद जोशी**

माजी खासदार राज्यसभा, संस्थापक, शेतकरी संघटना

संस्थापक, चाकण शिक्षण मंडळ

*उत्पादन खर्चावर आधारित भाव शेतमालाला मिळत नाही हीच शेती व त्यावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांची मूलभूत समस्या आहे हे मांडून या समस्येच्या सोडवणूकीसाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित करणारे योद्धा शेतकरी शरद जोशी*

## चाकण शिक्षण मंडळ



…श्री. शांतीलालजी मुथ्था

कार्यकारी विश्वस्त



मा. श्री. मोतीलालजी सांकला

प्रमुख विश्वस्त



मा. डॉ. अविनाश अरगडे

विश्वस्त सचिव

चाकण शिक्षण मंडळाचे,

# कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण

नॅक मानांकित

# चक्रभूमी

२०१८-१९

## शेती आणि शेतकरी विशेषांक

**संपादक मंडळ**

प्राचार्य, डॉ. राजेश लाटणे

प्रा. डॉ. राजेंद्र रसाळ

| | |
|---|---|
| प्रा. डॉ. दिलीप कसबे | प्रा. विकास देशमुख |
| प्रा. मिलिंद भुजबळ | प्रा. अफरोज इनामदार |
| श्री. गोविंदा राठोड | कु. आरती नेरपगार |

चाकण शिक्षण मंडळाचे

## कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण

# चक्रभूमी

२०१८-१९

# शेती व शेतकरी विशेषांक

चक्रभूमी या वार्षिक नियतकालिकाच्या स्वामित्वाबद्दल व अन्य तपशीलाबाबत निवेदन दि प्रेस अॅन्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स अॅक्ट नियम ८ व ४ प्रमाणे आवश्यक माहिती

प्रकाशन स्थळ : चाकण शिक्षण मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१

प्रकाशन काळ : २०१८-१९

मुद्रकाचे नाव : श्री. नवरंग ट्रेडर्स

पत्ता : दुकान नं. २३/२४/५६, गुरुदत्त सहवास सोसायटी, शनिवार पेठ, पुणे - ४११०३०

प्रकाशकाचे नाव : प्राचार्य डॉ. राजेश लाटणे
चाकण शिक्षण मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय,चाकण, ता. खेड, जि. पुणे - ४१०५०१

नियतकालिकाची मालकी : चाकण शिक्षण मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण, ता. खेड, जि. पुणे- ४१०५०१

संपादकाचे नाव : प्रा. डॉ. राजेंद्र रसाळ
चाकण शिक्षण मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१

मुखपृष्ठ : पुजा खलाटे, अर्जुन कारेगावे, निकिता राक्षे, आकांक्षा खैरे, आरती नेरपगार, अमृता मावळे आणि कोमल महालकर या विद्यार्थ्यांची चित्रे.

* या अंकातील सर्वच मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

* हा अंक फक्त खासगी वितरणासाठी आहे.

## आमचे धोरण

ग्रामीण भागातून आलेल्या आमच्या विद्यार्थ्यांना सर्वार्थाने सामर्थ्यशाली बनविणे आणि त्यांची उन्नती करणे, हे आमचे धोरण आहे. याबरोबरंच त्यांना स्वावलंबी करणे, त्यांचे ज्ञान आणि दृष्टी व्यापक करणे आणि जागतिकीकरणाच्या बदलत्या वातावरणात त्यांना उभे राहण्याची क्षमता प्राप्त करून देणे आणि प्रामुख्याने नैतिक, सामाजिक, बौद्धिक आणि सांस्कृतिक पातळीवर एक चांगली व्यक्ती म्हणून ते ओळखले जातील यासाठी सतत कार्यरत राहणे, हा धोरणातील महत्त्वाचा घटक आहे.

## ध्येय/उद्दिष्टे

१) विद्यार्थ्यांमध्ये नीतिमूल्ये आणि वचनबद्धता यांचे महत्त्व रुजविणे.

२) शहरीकरणामुळे निर्माण झालेल्या सर्व नागरी सुविधा खात्रीशीररित्या पुरविणे.

३) छोट्या पण उपयुक्त अभ्यासक्रमांची ओळख करून देणे.

४) उपयुक्त अभ्यासक्रम उपलब्ध करून देणे.

५) वाणिज्य प्रयोगशाळा, भाषिक प्रयोगशाळा, ग्रंथालय व जिमखाना या विशेष क्षेत्रातील सुविधांनी महाविद्यालय सुसज्ज करणे.

६) वैचारिक आणि व्यावहारिक जीवनात विद्यार्थ्यांना स्वयंपूर्ण करणे.

## वैचारिक दृष्टी

उत्तम शैक्षणिक वातावरणात विद्यार्थ्यांना स्वत:च्या ताकदीची आणि क्षमतेची ओळख होऊन, उत्तम विचार आणि उन्नत आकांक्षा साकार करण्याची दृष्टी मिळून त्यांचं एक परिपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवणे, हेच आमचे स्वप्न!

## महाविद्यालय विकास समिती

मा. श्री. मोतीलालजी सांकला – अध्यक्ष, म. वि. स.
मा. ॲड. राजेश कांडगे – सदस्य, म. वि. स.
श्री. प्रकाश मुटके – सदस्य, म. वि. स.
प्रा. डॉ. शिवाजी एंडाईत – सदस्य, म. वि. स.
प्रा. डॉ. अपर्णा महाजन – सदस्या, म. वि. स.
सौ. योगिता गवळी – सदस्या, म. वि. स.
मा. डॉ. अविनाश अरगडे – सचिव, चा. शि. मं.
मा. श्री. रामदास धनवटे – सदस्य, म. वि. स.
प्रा. डॉ. राजेंद्र रसाळ – सदस्य, म. वि. स.
प्रा. डॉ. दत्तात्रय तांबे – सदस्य, म. वि. स.
प्रा. विकास देशमुख – सदस्य, म. वि. स.
प्राचार्य डॉ. राजेश लाटणे – सचिव, म. वि. स.

## महाविद्यालयीन अध्यापक

### कला शाखा

अर्थशास्त्र विभाग : डॉ. राजेंद्र रसाळ, विभाग प्रमुख
प्रा. अंकुश सूर्यवंशी
मराठी विभाग : प्रा. डॉ. दिलीप कसबे, विभाग प्रमुख
प्रा. डॉ. शिवाजी एंडाईत
इंग्रजी विभाग : डॉ. राजेश लाटणे, प्राचार्य
प्रा.डॉ. अपर्णा महाजन, विभाग प्रमुख
प्रा. ज्ञानेश्वरी शिंदे
राज्यशास्त्र विभाग : प्रा. डॉ. सोपान घोळवे,,विभाग प्रमुख
इतिहास विभाग : प्रा. विकास देशमुख, विभाग प्रमुख

### वाणिज्य शाखा

प्रा. डॉ. दत्तात्रय तांबे, विभाग प्रमुख
प्रा. हेमकांत गावडे
प्रा. अफरोज इनामदार
प्रा. हनुमंत मराठे

### संगणक शाखा

प्रा. अफरोज इनामदार विभाग प्रमुख
प्रा. शिल्पा फुलवरे

### ग्रंथालय विभाग

प्रा. मिलिंद भुजबळ, ग्रंथपाल

### क्रीडा विभाग

प्रा. शैलेंद्र कांबळे, शारीरिक शिक्षण संचालक

## कार्यालयीन सहकारी वर्ग

सौ. योगिता गवळी – मुख्य लिपिक
श्री. नंदकुमार घाटकर – ग्रंथालय परिचर
श्री. शंकर नाईकनवरे – सेवक
श्री. अरूण जाधव – सेवक
श्री. अनिकेत कदम – वरिष्ठ लिपिक
श्री. राजाराम ढोरे – सेवक
श्री. शिवाजी भोसले – सेवक

## प्राचार्यांचे मनोगत

प्राचार्य, डॉ. राजेश लाटणे



भारत हा कृषिप्रधान देश आहे. आजही भारतामधील बहुसंख्य लोक शेती अथवा शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून आहेत. सुमारे पन्नास वर्षापर्यंत शेती व्यवसायास प्रतिष्ठा होती, शेतीच्या उत्पन्नाचे प्रमाण जरी कमी असले तरी त्यातून ग्रामीण अर्थकारण साध्य होत असे. शेतीला पूरक असणारे दुग्धव्यवसाय, कुक्कटपालन, शेळीमेंढी पालन इ. व्यवसायांमुळे घरातील तेला मीठासारख्या गरजा भागायच्या. त्याकाळामध्ये यांत्रिकीकरण फारसे नव्हते. शेतीचा व्यवसाय बैलांच्या मदतीने केला जायचा. बैल पोळा, बेंदूर, पाडवा, गुढीपाडावा इ. सण आनंदाने साजरे केले जायचे.

एकत्र कुटुंब पद्धत असायची. कालांतराने विभक्त कुटुंब पद्धती अपरिहार्यपणे स्वीकारावी लागली. शेतजमिनीचे विभाजन झाले. पाणी स्त्रोत म्हणजे विहिरी, विंधन विहिरी इत्यादींचेही विभाजन झाले. नैसर्गिक हवामानाच्या ऋतूमानातही बदल झाले. शासनाच्या धोरणांमुळे शेतकरी आणि शेती व्यवसाय दोघेही अडचणीत आले.

योध्दा शेतकरी शरद जोशी या बुध्दीमान व्यक्तीने या बाबींचा बारकाईने अभ्यास केल्यानंतर काही बाबी ठळकपणे त्यांच्या लक्षात आल्या. यामध्ये व्यापारी, दलाल, साठेखोर, आडते, शासकिय अधिकारी, आणि राज्यकर्ते अशी साखळीच शेतकऱ्यांचे शोषण करतेय हे त्यांच्या लक्षात आले. चाकण जवळील आंबेठाण येथे कोरडवाहू क्षेत्र घेऊन त्यामध्ये प्रत्यक्षात शेती करुन त्याच्या जमाखर्चाची तंत्रशुध्द नोंद करुन शरद जोशींनी अभ्यासपूर्ण लेखमालेतून, ग्रंथामधून, पुस्तकांमधून, भाषणांमधून, चर्चांमधून, आंदोलनांमधून शेतकरी वर्गास अर्थसाक्षर करण्याचा प्रयत्न केला. आज राज्यकर्त्यांच्या दृष्टीने व विरोधकांच्याही दृष्टीने शेती आणि शेतकऱ्यांचा प्रश्न राजकारणाच्या केंद्रस्थानी आणण्याचे श्रेय जाते ते शरद जोशींना.

शेती आणि शेतकरी जर जगले तरच जगाची अर्थव्यवस्था चालते. निर्मितीतून येणारे उत्पन्न हे कधीही चांगले. उच्च शिक्षित विद्यार्थ्यांनी शेती करावी, बाजारपेठ, बाजारभाव याचा अभ्यास करावा. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. शेतीपूरक व्यवसायही करावेत. त्याचबरोबर शेतीमालावर प्रक्रीया करुन उत्पादन करता येते की पहावे. याच भावनेने हा वार्षिकांक काढण्यात आला आहे.

* * *

## संपादकीय

**प्रा. डॉ. राजेंद्र रसाळ**



चक्रभूमीचा हा अंक 'शेती व शेतकरी विशेषांक' म्हणून प्रसिद्ध करण्याचे मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समितीच्या बैठकीत ठरविण्यात आले. विद्यार्थ्यांना लेखनास प्रोत्साहन देण्यासाठी लेखन कार्यशाळा, पोस्टर किंवा भित्तीपत्रक स्पर्धा, काव्यलेखन स्पर्धा, लेख स्पर्धा असे विविध उपक्रम राबविण्याचे निश्चित करण्यात आले. विद्यार्थ्यांचा या अंकाच्या निर्मितीत उत्साहवर्धक सहभाग राहण्यासाठी मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागातून आकाराला आलेला चक्रभूमीचा 'शेती व शेतकरी विशेषांक' वाचकांच्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. विशेष आनंद यासाठी की या अंकासाठी लेखन करणारे बहुतांश विद्यार्थी ही शेतकऱ्यांची मुले आहेत. त्यांचा शेतकऱ्यांची स्थिती, त्यांच्या समस्या, ग्रामीण जीवन, शेतीतील तंत्रज्ञान, शेतीतील महिला, शेतमजूर, शेतमाल विक्रीव्यवस्था अशा शेती व शेतकऱ्यांशी निगडीत बाबींशी जवळचा संबंध आहे. त्यामुळेच विद्यार्थ्यांनी या बाबींसंबंधी विचारपूर्वक लेखन केले आहे. तसेच चित्र किंवा पोस्टर व रांगोळ्यामधून त्यांनी शेती व शेतकऱ्यांच्या स्थितीवर भाष्य केले. शेती व शेतकऱ्यांच्या विकासासाठीची दिशा त्यांनी आपल्या लेखनातून मांडली आहे.

उत्पादनखर्चावर आधारित भाव शेतमालाला मिळत नाहीत हीच शेती व शेतकऱ्यांच्या बाबतीतील महत्त्वाची समस्या आहे हे प्रथम योद्धा शेतकरी शरद जोशी यांनी ठामपणे मांडले. उत्पादन खर्चावर आधारित भाव शेतमालाला मिळण्यासाठी आणि शेती व शेतकऱ्यांच्या विकासासाठी त्यांनी लेखन, अंदोलने व प्रबोधन या माध्यमातून कार्य केले. शेती व शेतकऱ्यांच्या स्थितीत जो काही बदल अलिकडील काळात झालेला दिसत आहे त्यात योद्धा शेतकरी शरद जोशी यांच्या विचाराचे व कार्याचे योगदान मोठे आहे.

शेतमालाला योग्य भाव मिळाल्याशिवाय शेती व शेतकऱ्यांच्या स्थितीत सुधारणा होणार नाही. शेतकऱ्याला आर्थिक दुरावस्थेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न राज्यकर्त्यांनी केला नाही, उलट शेतकरी गरीब कसा राहील हे त्यांनी पहिले कारण शेतकरी गरीब राहण्यातच त्यांचे हित होते. ग्रामीण भागात कृषी पूरक व कृषी आधारित उद्योग सुरू करण्यास सरकारने मदत व प्रोत्साहन दिले असते तर शेती व शेतकऱ्यांना आधार मिळून शेती व शेतकऱ्यांच्या स्थितीत सुधारणा झाली असती यात शंकाच नाही. शेतमालाला रास्त भाव, शेती पूरक व शेती आधारित उद्योगाचा विकास आणि ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा विकास ही शेती व शेतकरी विकासाची त्रिसूत्री पुढे ठेवून प्रयत्न करण्याची गरज आहे.

चाकण शिक्षण मंडळाचे सचिव मा. डॉ. अविनाश अरगडे आणि विश्वस्त मा. श्री. मोतीलालजी सांकला यांचे या कार्यात मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश लाटणे यांनी चक्रभूमीचा 'शेती व शेतकरी विशेषांक' दर्जेदार होण्यासाठी वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन केले.

या अंकाच्या निर्मितीत प्रा. डॉ. दिलीप कसबे, प्रा. विकास देशमुख, प्रा. मिलिंद भुजबळ, प्रा. अफरोज इनामदार, श्री. अनिकेत कदम यांचे सहकार्य मिळाले. तसेच महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक व शिक्षकेतर सहकारी यांचीही या कार्यात मदत झाली. कु. आरती नेरपगार आणि श्री. गोविंदा राठोड या विद्यार्थ्यांनी यात सक्रिय सहभाग घेतला. महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनींनी लेख व कविता लेखन, मुलाखती, शेती व शेतकरी या विषयावरील चित्रे व रांगोळ्या या माध्यमातून अंक निर्मितीत उत्साहवर्धक सहभाग घेतला. श्री. नवरंग ट्रेडर्सचे श्री. राहुल जोशी यांनी हा अंक सुबक, दर्जेदार व आकर्षक आणि वेळेत तयार करून दिला. या सर्वांबद्दल मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो.

* * *

## ✲ अनुक्रमणिका ✲


| अ.क्र. | लेख | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | शाश्वत शेती- काळाची गरज | अमित पवार | १ |
| २. | भारत - कृषीप्रधान अर्थव्यवस्था | देवयानी मुळे | ३ |
| ३. | शेतकऱ्यांच्या आत्महत्या | ऋतुजा कोळेकर | ४ |
| ४. | शेती-निसर्गाशी खेळलेला जुगार | संध्या खेडकर | ६ |
| ५. | व्यथा जगाच्या पोशिंद्याची | अर्जून कारेगावे | ७ |
| ६. | महाराष्ट्रातील दुष्काळ व शेतकरी | शिवानी कौटकर | ९ |
| ७. | शेतकऱ्यांच्या समस्या | युगंधरा करपे | १० |
| ८. | महिलांचे शेती विकासातील स्थान | तारा प्रसाद | ११ |
| ९. | भारतातील शेतमजूराची दुरावस्था | मिसबा काझी | १२ |
| १०. | शेतमाल विक्रीव्यवस्था : उणीवा व उपाय | स्नेहल गाडे | १४ |
| ११. | मृदा प्रदूषण व शेती | स्वाती आरगडे | १६ |
| १२. | धारण क्षेत्राचा घटता आकार व सामुहिक शेती | धनश्री निवाते | १७ |
| १३. | शेतीचे यांत्रिकीकरण - लाभ व अडथळे | जयश्री कोळेकर | १८ |
| १४. | चाकण परिसरातील शेत जमीनीचा बिगरशेती कारणांसाठी वापर | संजना नलावडे | २० |
| १५. | शेतकरी महिलेची सामाजिक स्थिती | आयोध्या काटकर | २१ |
| १६. | सेझ व शेतकरी | प्रियंका पवळे | २३ |
| १७. | शेतकरी आंदोलने : काल आणि आज | विश्वनाथ लिंभोरे | २४ |
| १८. | योध्दा शेतकरी - शरद जोशी | गोविंदा राठोड | २६ |
| १९. | शेतीसाठीच्या पाणी वापराचे नियोजन | प्रतिक्षा फडके | २८ |
| २०. | शेतीला पूरक व्यावसायाची जोड आवश्यक | ऋषिकेश शिवेकर | २९ |
| २१. | शेती व आधुनिक तंत्रज्ञान | काजल जाधव | ३० |
| २२. | शेतमाल प्रक्रिया उद्योगांची आवश्यकता | प्रणाली पवार | ३२ |
| २३. | सेंद्रिय शेतीची आवश्यकता | प्रफुल्ल झाडे | ३४ |
| २४. | शेतीविकासासाठी उपाय | आरती जाधव | ३६ |

| अ.क्र. | कविता | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | कैफियत | ज्योती खुडे | ३७ |
| २. | नियतीचा खेळ | आश्विनी गायकवाड | ३७ |
| ३. | जीवन ओघ | विशाल डोंगर | ३८ |
| ४. | शेतकरी जीवन | गोविंदा राठोड | ३८ |
| ५. | शेतकऱ्यांचा आक्रोश | रुपाली सोनवणे | ३९ |
| ६. | बदललेली नाती | आकाश फुलसुंदर | ४० |
| ७. | अस्वस्थ शेतकरी | संजना नलावडे | ४० |
| ८. | तुझीच जीवनगाथा | निलम राजिवडे | ४१ |
| ९. | शेतकऱ्याची जिद्द | आरती नेरपगार | ४१ |
| १०. | शेतकरी बाप | शुभम बैले | ४२ |
| ११. | शेतकरी राजा | हर्षदा परदेशी | ४२ |
| १२. | माती माझं सोनं | विशाल आगरकर | ४२ |
| १३. | गुन्हा काय केला? | अर्जून कारेगावे | ४३ |
| १४. | जगाचा पोशिंदा | वैभव थोरात | ४३ |
| १५. | लढाई | ज्योती जाचक | ४४ |
| १६. | मी आत्महत्या करणार नाही | शिल्पा बनासे | ४४ |
| १७. | सरकारला आवाहन | पायल आरगडे | ४४ |
| १८. | कष्टाचा मानकरी शेतकरी | कृष्णा जोगदंड | ४४ |

| अ.क्र. | मुलाखत | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्याची मुलाखत | ऋतुजा गांडेकर | ४५ |
| २. | शेतमाल प्रक्रिया उद्योगाच्या प्रमुखाची मुलाखत | ज्योती जाचक | ४७ |
| ३. | जिद्दी शेतकरी महिलेची मुलाखत | निकीता जाधव | ४९ |
| ४. | कृषी सहाय्यकाची मुलाखत | आरती नेरपगार | ५१ |
| ५. | पी.डी.सी.सी. बँक शाखा व्यवस्थापकाची मुलाखत | अजिंक्य महाळुंगकर | ५२ |

| अ.क्र. | शैक्षणिक अहवाल | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | वाणिज्य विभाग | प्रा. डॉ दत्तात्रय तांबे | ५३ |
| २. | अर्थशास्त्र विभाग | प्रा. डॉ. राजेंद्र रसाळ | ५४ |
| ३. | मराठी विभाग | प्रा. डॉ. दिलीप कसबे | ५५ |
| ४. | इंग्रजी विभाग | प्रा. डॉ. अपर्णा महाजन | ५६ |
| ५. | राज्यशास्त्र विभाग | प्रा. डॉ. सोपान घोळवे | ५६ |
| ६. | इतिहास विभाग | प्रा. विकास देशमुख | ५६ |
| ७. | जिमखाना विभाग | प्रा. शैलेंद्र कांबळे | ५७ |
| ८. | ग्रंथालय विभाग | प्रा. मिलिंद भुजबळ | ५८ |

| अ.क्र. | अभ्यासपूरक उपक्रम | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | अल्पकालीन अभ्यासक्रम | प्रा. डॉ. अपर्णा महाजन | ६० |
| २. | स्पर्धा परीक्षा विभाग | प्रा. डॉ. दिलीप कसबे | ६० |
| ३. | बहि:शाल शिक्षण मंडळ | प्रा. डॉ. शिवाजी एंडाईत | ६१ |
| ४. | विविध स्पर्धा मार्गदर्शन विभाग | प्रा. हेमकांत गावडे | ६२ |
| ५. | परीक्षा विभाग | प्रा. डॉ. सोपान घोळवे | ६३ |

| अ.क्र. | अभ्यासेतर उपक्रम | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | राष्ट्रीय सेवा योजना | प्रा. डॉ. दत्तात्रय तांबे | ६४ |
| २. | विद्यार्थिनी उद्योजकता | प्रा. अंकुश सूर्यवंशी | ७१ |
| ३. | विद्यार्थी विकास मंडळ | प्रा. डॉ. दिलीप कसबे | ७२ |
| ४. | प्राध्यापक प्रबोधिनी | प्रा. हेमकांत गावडे | ७३ |
| ५. | प्लेसमेंट विभाग | प्रा. अफरोज इनामदार | ७३ |
| ६. | मा. शरद जोशी वैचारिक व्याखानमाला | प्रा. विकास देशमुख | ७४ |
| ७. | कॅम्पस फिल्म सोसायटी | प्रा. डॉ. अपर्णा महाजन | ७५ |
| ८. | विद्यार्थी परिषद व नेचर व ट्रेक क्लब | प्रा. शैलेंद्र कांबळे | ७५ |
| ९. | सांस्कृतिक विभाग | प्रा. मिलिंद भुजबळ | ७६ |
| १०. | लैंगिकछळ तक्रार निवारण समिती व विद्यार्थी पालकसभा | प्रा. डॉ. अपर्णा महाजन | ७७ |
| ११. | स्थानिक तक्रार निवारण समिती | प्रा. शैलेंद्र कांबळ | ७७ |

## शै. वर्ष २०१८-१९ मधील गुणवंत विद्यार्थी

### कला शाखा

**प्रथम वर्ष**

| | |
|---|---|
| कु. योगिता निलेश जाधव | ६९.३३% |
| कु. किर्ती रामदास पोटवडे | ६४.१६% |
| कु. पल्लवी नंदकुमार बर्गे | ६२.८३% |

**द्वितीय वर्ष**

| | |
|---|---|
| कु. प्राची शिवाजी कुटे | ७५.६६% |
| कु. पायल लक्ष्मण आरगडे | ७०.३३% |
| कु. ऐश्वर्या गोरख राऊत | ६५.००% |

**तृतीय वर्ष**

| | |
|---|---|
| कु. धनश्री काळुराम शिंदे | ७५.००% |
| श्री. गोविंदा अर्जुन राठोड | ७०.०८% |
| श्री. निखील ज्ञानदेव शिंगोटे | ६७.००% |

### वाणिज्य शाखा

**प्रथम वर्ष**

| | |
|---|---|
| कु. कोमल बाबाजी पोटवडे | ८२.५७% |
| कु. तेजश्री लक्ष्मण पोटवडे | ८०.८६% |
| कु. ज्योती कानिफनाथ पोटवडे | ७८.१४% |

**द्वितीय वर्ष**

| | |
|---|---|
| कु. मिसबा कासम काझी | ७८.५०% |
| कु. संध्या प्रकाश खेडकर | ७७.००% |
| कु. युगंधरा मच्छिंद्र करपे | ७३.५०% |

**तृतीय वर्ष**

| | |
|---|---|
| कु. प्रतिक्षा माणिक फडके | ८२.३३% |
| श्री. सचिन राजाराम गुंजाळ | ७६.६६% |
| कु. सुमैया नासिर इनामदार | ७६.५०% |

### बी. सी. ए.

**द्वितीय वर्ष**

| | |
|---|---|
| कु. निकिता दिनेश जगदाळे | ६४.२५% |
| कु. उज्वला भरत पडवळ | ६३.७५% |
| कु. सपना राघु मरगज | ६३.६६% |

**तृतीय वर्ष**

| | |
|---|---|
| कु. हर्षदा आनंदा कुटे | ७१.७५% |
| कु. सोनाली बाळू कोळेकर | ६४.६६% |
| कु. वैष्णवी दत्तात्रय लिंभोरे | ६४.१६% |

## महाविद्यालयात मिळणाऱ्या शिष्यवृत्ती व शुल्क सवलती

**राज्यशासनाच्या आर्थिक सवलती –**

निरनिराळ्या शासकीय योजनेद्वारे पात्र विद्यार्थ्यांना खालील सवलती उपलब्ध आहेत.

१. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना फी सवलत (E.B.C.)

२. शासकीय खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.

३. प्राथमिक शिक्षकांच्या मुला- मुलींना पात्रतेनुसार मिळणारी फी/सवलत.

४. अनुसूचित जाती- जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती फी/ सवलत.

५. अपंग मुलांना शिष्यवृत्ती

६. शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पाल्यांना मिळणारी फी/ सवलत.

७. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी (E.B.C.) फी/ सवलती

८. स्वातंत्र्य सैनिकांच्या संरक्षण खात्यातील मुला-मुलींना मिळणारी फी/ सवलत

९. शासकीय खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती (Government merit scholarship)



## शाश्वत शेती– काळाची गरज

अमित पवार
द्वितीय वर्ष कला

आपल्याला माहितच आहे की भारतीय परंपरा ही फार जुनी आहे. हे कृषी पराशर, वृक्षसंहिता, अर्थवेद इत्यादी प्राचीन ग्रंथापासून स्पष्ट होते. प्राचीन काळापासून ते रासायनिक खताचा वापर सुरु होईपर्यंत जनावराच्या शेणापासून तयार झालेले शेणखत, शेतीतील पिकाचे उरलेले अवशेष तसेच विविध प्रकारच्या पेंढी याचा वापर करुन भारतीय शेतकरी पारंपरिक पध्दतीने विविध अन्नधान्याचे उत्पादन घेत असे. रासायनिक खताचा वापर शेतकरी हरितक्रांती सुरु झाल्यापासून मोठ्या प्रमाणात करु लागले. तसेच अधिक उत्पादन देणाऱ्या अन्नधान्याच्या संकरित जातीच्या शोधामुळे खऱ्या अर्थाने हरितक्रांतीची बीजे रोवली गेली आणि भारत देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला.

शेती व्यवसायाची पारंपारिक संसाधने, नितीमुल्ये व वारसा जपण्यासाठी अत्याधुनिक व अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करुन उज्वल भवितव्यासाठी केली जाणारी शेती म्हणजे 'शाश्वत शेती'.

'जुनं ते सोनं आणि नवं ते हवं' ही म्हणं नेहमीच आपण ऐकत असतो. याच म्हणीचा आपल्या व्यावहारी जीवनात, व्यवसायात उपयोग केल्यास तो व्यवसाय आधिक फायदेशीर ठरेल यात शंकाच नाही. आजच्या युगात शेती हे केवळ उदरनिर्वाहाचे साधन राहिले नसून आता शेतीकडे लोक व्यवसाय म्हणून पाहू लागले आहेत आणि याचाच परिणाम शेती करण्याच्या पध्दतीवर झाला. त्यामुळे शेतीमध्ये आधुनिकीकरण वाढत गेलं. मग त्यामध्ये खताचा बेसुमार वापर संकरित बियांणापासून उत्पादन किटक नाशकाचा व जंतूनाशकाचा अवाजवी वापर इत्यादीचा सहभाग शेतीत करण्यात आला.

पारंपरिक अवजारांचा व जनावरांचा वापर कमी होवू लागला. त्यांची जागा ट्रॅक्टर, यंत्र इत्यादींनी घेतली. याचाच परिणाम म्हणजे ६० व्या दशकातील हरितक्रांती म्हणता येईल. परंतु कालांतराने याचा गोष्टींचा परिणाम नैसर्गिक संसाधनावर होत गेला. उदा. खताच्या अवाजवी वापरामुळे जमिनीतील सुपिकतेचा ऱ्हास होत गेला. त्यातील जैविक घटकांची संख्या कमी होणे, जमिनीची पातळी बिघडणे किटकनाशकाच्या अनियमित व अनियंत्रित व अतिवापरामुळे मानवी आरोग्यावर दुष्परिणाम होणे, पाणी प्रदुषण होणे संकरित करणामुळे स्थानिक दुर्मिळ जाती नष्ट होणे अशा अनेक अडचणी कृषी व्यवसायाला भेडसावू लागल्या. मग या निविष्ठांचा वापर शेतीमध्ये करुच नये का? पारंपरिक शेती योग्य आहे का? मग उत्पादन वाढवण्याची पर्यायी व्यवस्था काय असेल असे अनेक प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात निर्माण होतात.

मग सेंद्रिय शेती याला पर्याय असू शकतो का? रासायनिक खताऐवजी सेंद्रिय खते, गांडूळ खते, शेणखते इ. रासायनिक किटकनाशकाऐवजी सेंद्रिय किटकनाशके वापरणे, मित्र किटकांचा वापर अशाप्रकारे काही शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीची कास धरल्यामुळे सकारात्मक बदलही घडून आले.

उदा. मातीमध्ये जैविक घटकांचे प्रमाण वाढणे, त्यामुळे आधिकाधिक काळासाठी माती सुपिक राहणे, उत्पादन खर्च होणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सेंद्रिय शेतीपासून मिळालेले उत्पादन मानवी आरोग्यासाठी दुष्परिणाम करत नाही. सामान्य शेती मालाच्या तुलनेत त्याला आधिक भावही मिळू लागला.

सेंद्रिय शेतीमधील उत्पादकता तुलनेने कमी असल्याचे निदर्शनात आले आहे. तसेच सेंद्रिय शेतीचे परिणाम त्वरित दिसत नाहीत. त्यासाठी काही अवधी जाणे गरजेचे आहे. अचानक बुरशी अथवा किडीचा जास्त प्रमाणात प्रादुर्भाव झाल्यास त्यावर सेंद्रिय पध्दतीचा योग्य

## संपादकीय मनोगत

प्रा. डॉ. दिलीप कसबे



शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षाच्या चक्रभूमी नियतकालिकांची जबाबदारी मा. प्राचार्यांनी माझ्याकडे दिली. त्यानंतर मी व या समितीत असलेल्या सर्व सदस्यांनी 'चक्रभूमी' च्या थिमचा विचार करायला सुरुवात केली. कारण या महाविद्यालयाची परंपरा आहे की, प्रत्येक वर्षी एक नवीन थिम घेऊन नियतकालिक काढणे, याही वर्षी आमच्यासमोर अनेक विषय विशेषांक चर्चेसाठी समोर आले,मा. प्राचार्यांच्या समवेत वेगवेगळया विषयांची चर्चा होऊन सर्वानुमते 'अंधश्रध्दा' हा विषय निश्चित करण्यात आला.

अंधश्रध्देवर आयुष्यभर काम करणारे डॉ. नरेंद्र दाभोळकर यांची हत्या झाली. त्यानंतर कॉम्रेड गोविंद पानसरे, कलबुर्गी यांच्या हत्या करण्यात आल्या. या सर्वांनी समाजाला अज्ञानाच्या विचारातून बाहेर काढण्यासाठी आयुष्यभर कामे केले. पण अविचारी माणसांनीच त्यांच्या हत्या केल्या त्यांना प्रथम वंदन करतो. भारतामध्ये आजही ९०% लोक अंधश्रध्देच्या आहारी जातात आणि दुसऱ्याचे व आपलेही आयुष्य बरबाद करतात. महाविद्यालयातील गायकवाड नावाच्या माजी विद्यार्थ्याचा या कृत्यातून बळी गेलेला आहे. देव, धर्म, जादूटोणा भूतपिशाच पैसा अपत्य लालसा इ. च्या प्रलोभनासाठी माणसे पशु नव्हेतर माणसांचाही बळी देतात. ही घटना माणुसकीला काळीमा फासणारी आहे. अंधश्रध्देमुळेच लहान मुलांचा व स्त्रियांचाही छळ होतो. खोटी प्रतिष्ठा हा सुध्दा अंधविचारांचाच भाग आहे. त्यामुळे स्वत:ला उच्चभ्रू समाजणार समाज आपल्या मनाविरुध्द वागलेल्या तरुण मुलामुलींची निर्घृण हत्या करतो ती अंध विचारामुळेच. महाराष्ट्र हा समाज सुधारकांचा, संताचा, महंताचा आहे.त्यांनी प्रबोधनाची चळवळ संपूर्ण देशाला दिली. भारताच्या, महाराष्ट्राच्या इतिहासात त्यांचे महत्त्वाचे स्थान आहे. महाराष्ट्राला अशा प्रकारची अविचारी कृत्ये शोभणारी नाहीत.

याविषयी विद्यार्थ्यांना जाणीव व्हावी. विद्यार्थ्यांना आपले विचार व्यक्त करता यावेत. यासाठी अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते मा. श्री. नवनाथ लोंढे यांचे महाविद्यालयात व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी वैज्ञानिक प्रयोग सादर करुन विद्यार्थ्यांना लेखनाविषयी मार्गदर्शन केले. तसेच अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे दुसरे कार्यकर्ते वसुंधरा बहुउद्देशिय संस्थेचे सदस्य मा. श्री. अतूल सव्वाखंडे सर यांनी त्यांच्याकडे असलेली पुस्तके उपलब्ध करुन दिली. ही पुस्तके महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आली. स्पर्धा विभागातर्फे निबंधस्पर्धा, वक्तृत्वस्पर्धा घेण्यात आल्या. तसेच पोस्टर, रांगोळीस्पर्धा, अंधश्रध्दा याच विषयावर घेण्यात आल्या त्यातूनच मुखपृष्ठ तयार झाले. प्रा. अफरोज इनामदार यांनी लेखांची निवड करण्यास मदत केली. तसेच सर्व कार्यक्रमांच्या उपक्रमांच्या फोटोचीही निवड करण्यास मदत केली.

चाकण शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. अविनाश अरगडे आणि विश्वस्त मोतीलालजी सांकला यांचेही वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश लाटणे यांनी सुरुवातीपासून अंक तयार होईपर्यंत प्रत्येक कामात योग्य मार्गदर्शन केले. तसेच प्रा. विकास देशमुख, प्रॉ.डॉ. राजेंद्र रसाळ, प्रा. मिलिंद भुजबळ, डॉ. सौ. अपर्णा महाजन, प्रा. डॉ. शिवाजी एंडाईत, श्री. अनिकेत कदम, महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी यांचेही सहकार्य मिळाले. विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या लेखामुळेच हा अंक पूर्णत्वास गेला श्री. राहूल जोशी यांनी नियतकालिकाची आकर्षक व सुबक मांडणी केली. या सर्वांच्या बद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.





## * अनुक्रमाणिका *


| अ.क्र. | लेख | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | जादूटोणा कायदा : अडचणी व त्रुटी | ऋषीकेश चव्हाण | १. |
| २. | समाज आणि अंधश्रद्धा | नंदकुमार आरेकर | ४. |
| ३. | बुवाबाजी | भास्कर सरकटे | ६. |
| ४. | ते चार दिवस... आणि अंधश्रद्धा | राम नलावडे | ९. |
| ५. | श्रद्धा आणि अंधश्रद्धा | प्रतिक्षा फडके | ११. |
| ६. | विज्ञानातील विश्वास आणि अविश्वास | मोनिका कोळेकर | १३. |
| ७. | अंधश्रद्धेची भीती | अक्षदा घारे | १६. |
| ८. | विज्ञान आणि अंधश्रद्धा | मोनाली रोकडे | १७. |
| ९. | अंधश्रद्धेचे स्वरुप | भारती पोटवडे | १८. |
| १०. | अंधश्रद्धा निर्मूलन : नरेंद्र दाभोळकर यांचे योगदान | शुभांगी गालफाडे | २०. |
| ११. | अंधश्रद्धेचा विळखा | देवयानी मुळे | २२. |
| १२. | अंधश्रद्धा आणि युवाशक्ती | कोमल महालकर | २४. |
| १३. | श्रद्धा, अंधश्रद्धा आणि आपण | प्रियांका गोपाळे | २६. |
| १४. | अंधश्रद्धा निर्मूलन समिती | किरण भागीत | २७. |
| १५. | अंधश्रद्धा : एक शाप | लोचन गोरे | २९. |
| १६. | अंगात येणारे वारे : किती खोटे किती खरे | निलम भुजबळ | ३१. |
| १७. | अंधश्रद्धेच्या अमानुष प्रथा | पूजा इंगोले | ३३. |
| १८. | अंधश्रद्धा निर्मूलन | प्रियांका जोजाडे | ३५. |
| १९. | अंधश्रद्धेला पर्याय निर्मूलन हाच उपाय | जयश्री कोळेकर | ३६. |
| २०. | अंधश्रद्धा | माधुरी चव्हाण | ३७. |
| २१. | अंधश्रद्धा : समाजाला लागलेले खग्रास ग्रहण | निकिता जाधव | ३८. |
| २२. | अंधश्रद्धा निर्मूलन काळाची गरज | आरती नवरे | ४१. |
| २३. | पैशाचा पाऊस | मयुर वाघुले | ४२. |

| अ.क्र. | कविता | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | श्रद्धा म्हणून सुरु झाली अंधश्रद्धा | भास्कर सरकटे | ३. |
| २. | अंधश्रद्धेतला माणूस | नंदकुमार आरेकर | ८. |
| ३. | असा कसा दगडाचा देव | श्वेता शिंदे | १०. |
| ४. | शोध | माधुरी चव्हाण | १५. |
| ५. | अंधश्रद्धा काय आहे | विशाल आगरकर | १९. |
| ६. | अंधश्रद्धा निर्मूलन | मोनाली रोकडे | २३. |
| ७. | दाभोळकरांचे विचार | प्रतिक्षा रोकडे | २५. |